**L. A. BILL No. XI OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA NURSES ACT, 1966.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११.

**महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६६ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १९ डिसेंबर २०२० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ४० ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ याच्या कलम ४० मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९६६ चा महा. ४०.

" परंतु, राज्यात कोविड-१९ या सार्वत्रिक साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे, या पोट-कलमान्वये तरतूद केलेल्या वाढीव मुदतीत परिषद घटित केली जाऊ शकत नसेल तर, राज्य शासनास, आणखी एक वर्षाच्या मुदतीसाठी प्रशासकाच्या नियुक्तीची मुदत वाढविता येईल, परंतु ती एकूण तीन वर्षांहून अधिक असणार नाही.".

प्रशासकाने केलेल्या कृतींची व गोष्टींची विधिग्राह्यता.

**३.** महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ याच्या कलम ४० च्या पोट-कलम (३) अन्वये नियुक्तीची वाढवलेली मुदत समाप्त झाल्यानंतर हा अधिनियम **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापर्यंत, प्रशासकाने केलेल्या सर्व कृती व गोष्टी आणि हाती घेतलेल्या सर्व उपाययोजना, जणू काही त्याच्या नियुक्तीची मुदत अशा प्रकारे समाप्त झाली नव्हती असे समजून वैधरीत्या केल्या असल्याचे किंवा हाती घेतलेल्या असल्याचे मानण्यात येईल; आणि ती कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद ठरवली जाणार नाही, किंवा, अशा प्रशासकाने, उक्त अधिनियमान्वये, अशा कालावधीत वापरलेले अधिकार, पार पाडलेली कर्तव्ये आणि केलेली कार्ये, कोणताही वैध प्राधिकार नसताना वापरले होते किंवा, पार पाडली होती किंवा केली होती केवळ एवढ्याच कारणावरून, अशा व्यक्तीच्या किंवा महाराष्ट्र परिचारिका परिषदेच्या विरोधात कोणताही दावा किंवा अन्य कार्यवाही सुरू करण्यात येणार नाही किंवा चालविली जाणार नाही. १९६६ चा महा. ४०.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११.]**

**[ महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. अमित देशमुख,**
वैद्यकीय शिक्षण मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.